महात्मा गांधीजी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राष्ट्रवादी विचारांचे तुलनात्मक अध्ययन

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मानवविज्ञान विद्याशाखेतंर्गत राज्यशास्त्र या विषयातील पीएच.डी. संशोधनासाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधक

लक्ष्मण बाबाराव यादव

M.A., Be.D., NET

राज्यशास्त्र विभाग

बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय, पारवा

ता. घाटंजी जि. यवतमाळ

मार्गदर्शक

प्रा.डॉ. डी.एच. मेहत्रे

(M.A., SET, NET, M.Phil., Ph.D.)

राज्यशास्त्र विभागप्रमुख

राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड, जि. नांदेड

संशोधन केंद्र : पीपल्स कॉलेज, नांदेड

मार्च : २०२२

महात्मा गांधीजी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राष्ट्रवादी विचारांचे तुलनात्मक अध्ययन

विषय प्रवेश (Subject of Entry)

भारतीय राष्ट्रवाद हा विविधतेत एकता निर्माण करणारा असला तरी स्वातंत्र्योत्तर कालखंडापासूनच प्रांतवाद, भाषावाद, जमातवाद, जातीयवाद, दहशतवाद, राजकीय पक्षांची राष्ट्रवाद विरोधी भूमिका आणि भ्रष्टाचार या घटकांमुळे भारतीय राष्ट्रवाद मोडीत काढला जात आहे. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात ब्रिटिश विरोधात स्वातंत्र्य आंदोलने चालवत असताना भारतीयांत राष्ट्रवाद निर्माण झालेला होता अगदी तसेच आज ही भारतीयांमध्ये राष्ट्रवादाची भावना निर्माण करून ती कायम ठेवण्यासाठी महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्रवादी विचार निश्चितच पूरक असतील. जरी त्यांच्या राष्ट्रवादी विचारात साम्यता नसली तरी राष्ट्रवादाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन हा वेगवेगळा असेल असा वेगळा दृष्टिकोन तुलनात्मक दृष्ट्या प्रस्तुत शोध निबंधात अभ्यासला जाणार आहे.

राष्ट्रवाद या विचारसरणीचे अवशेष प्राचीन काळापासून दिसत असले तरी पूर्वी तिच्यात एक संघता मुळीच नव्हती. प्राचीन काळी ग्रीकमध्ये नगर राज्ये अस्तित्वात होती. भारतात गणराज्ये, राजेशाही तर रोमन राजघराण्याचे साम्राज्य दिसून येते. त्यामुळे आधुनिक राष्ट्रवादाचा जन्म फ्रेंच राज्यक्रांतीनंतर म्हणजे १८ व्या व १९ व्या शतकांच्या दरम्यान झालेला दिसून येतो. साधारणता: राष्ट्रवादाला दोन शतकेपूर्ण झाली आहेत. समान भाषा, समान संस्कृती, सलग भुप्रदेश, समान इतिहास, समान परंपरा इत्यादी राष्ट्रवादाचे खास वैशिष्ट्ये मानली जातात. राष्ट्रवाद ही आधुनिक काळतील अत्यंत प्रभावी व शक्तीशाली विचारधारा म्हणून समोर आली आहे. राष्ट्र-राज्यांच्या उदयामुळे राष्ट्रवाद हा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय राजकारणातील मुख्य केंद्रबिंदू झाला आहे.

धर्मसुधारणा, सामाजिक चळवळीच्या प्रबोधनातून सुरूवातीला राष्ट्रवादाचा उगम पश्चिम युरोपमध्ये १८ व्या शतकात झाला. पुढे १९ व्या शतकामध्ये राष्ट्रवादाने पूर्ण युरोपभर आपले पाळेमुळे विस्तारले. दुसऱ्या महायुद्धांच्या समाप्तीनंतर लॅटिन अमेरिका, आफ्रिका आणि आशिया

खंडात मोठ्या प्रमाणात राज्य स्वातंत्र्य झाली. त्यामुळे खऱ्या अर्थाने १९४७ नंतर जगात राष्ट्रवादाचा विकास झालेला दिसून येतो.

राष्ट्र आणि राष्ट्रभूमी यांना आदर्श मानून त्यावर निष्ठा ठेवणारी आधुनिक राजकीय विचारपणाली व त्यावर आधारलेला ध्येयवादाने १९ व्या शतकापासून युरोपच्या इतिहासाला दिशा देणारी एक प्रमुख प्रेरणा म्हणून राष्ट्रवादाचा निर्देश करता येईल. युरोपच्या धर्तीवर राष्ट्रवादाने पहिल्या महायुद्धानंतर आशिया खंडात आणि दुसऱ्या महायुद्धानंतर आफ्रिका खंडात राष्ट्रवादाची भावना प्रज्वलीत केली. एक राजकीय विचारप्रणाली या अर्थाने राष्ट्राचे स्वातंत्र्य आणि एकता कायम राखण्याचे राष्ट्रवादाचे स्वयंसिद्ध ध्येय होते. राष्ट्रीय स्वयंनिर्णयाच्या म्हणजेच राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या हक्कांचा पुरस्कार करणे, हे व्यक्तिस्वातंत्र्याच्या संकल्पनेचे सामूहिक आणि राष्ट्रीय रूप होते. याबरोबरच विकासोन्मुख आणि न्यायाधिष्ठित समाजरचना निर्माण करणे आणि जागतिक शांतता व सहकार्य साध्य करणे, ही उद्दिष्टे साध्य करावयाची असतील, तर व्यक्तिस्वातंत्र्यास पूरक असलेल्या राष्ट्रवादाचा आग्रह धरावा अशी भूमिका उदारमतवादी जॉन स्टयुअर्ट मिल, जोसेफ मॅझिनी, वुल्ड्रो विल्सन यांनी घेतली. परंतु दोन महायुद्धांदरम्यानच्या कालखंडात नाझीझम आणि फॅसिझममुळे राष्ट्रवादाचे अतिरेकी आणि विकृतीकरण झाले. परंतु दुसऱ्या महायुद्धात या शक्तीला आळा बसून राष्ट्रवादाला लागलेले ग्रहण सुटून महायुद्धोत्तर काळात आशिया-आफ्रिका खंडात राष्ट्रवादाने एक स्वातंत्र्यवादी आणि पुरोगामी प्रेरणा रूजविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. प्रगत औद्योगिक समाजात राष्ट्रवादी प्रेरणेचा भर काहीसा ओसरला असला, तरी नवजात राष्ट्रांमध्ये मात्र अंतर्गत आणि बाह्य विघटनवादी शक्तींचे आव्हान पेलणारी एक विकासोन्मुख आणि लोकशाहीवादी प्रेरणा, म्हणून राष्ट्रवादाचे ऐतिहासिक कार्य संपले नाही.

राष्ट्रवाद (Nationalism) या शब्दाच्या उत्पत्ती वरून राष्ट्रवादाचा अर्थ स्पष्ट होतो. राष्ट्रवाद या शब्दाची उत्पत्ती 'राष्ट्र' (Nation) या शब्दापासून झाली. Nation हा शब्द मूळ लॅटिन भाषेतील Natus या शब्दापासून उगम झाला आहे. यांचा अर्थ जन्म किंवा वंश असा होतो. वांशिक, सांस्कृतिक आणि भाषिक आधारावर एकसंघ समुदाय म्हणजे राष्ट्रवाद होय. ''समान स्नेहसंबंध असलेल्या लोकांत जेव्हा मानसिक व भावनात्मक ऐक्य निर्माण होते, तेव्हा त्या भावनेस

राष्ट्रवादाची भावना असे म्हणतात. समान भाषा समान धर्म समान इतिहास इत्यादींमुळे लोकात भावनात्मक ऐक्य निर्माण होत असते'' व हेच राष्ट्रवादाचे आधारभूत घटक आहेत.

राष्ट्रवादाचे स्वरूप प्रदेशपरत्वे बदलत असते कारण तेथील राजकीय, सामाजिक रचनेचा प्रभाव राष्ट्रवादावर पडत असतो. राज्यशास्त्रातील वेगवेगळ्या विद्वानांनी राष्ट्रवादाच्या अर्था विषयी स्वतंत्र मत मांडले. यात बर्जेस आणि लिकाक म्हणतात की,''वांशिक ऐक्य असलेला व एकाच भौगोलिक प्रदेशात राहणारा जनसमुदाय म्हणजे राष्ट्रवाद होय.'' बार्कर यांच्या मते,''एखादा जनसमुदाय जेव्हा स्वतःस राष्ट्र मानतो तेव्हा त्यांचे राष्ट्र बनते.'' हॅन्स कोहेन यांच्या मते,''स्वतःस सर्वश्रेष्ठ सत्ता संपन्न राजकीय संस्थेत निर्माण करण्याची इच्छा बाळगणारा स्वातंत्र्य व सार्वभौम असा समाज जो समान भावनेमुळे एकत्र जखडला जातो ते राष्ट्र होय.'' डॉ. आसिर्वाथम यांच्या मते,''राष्ट्रवाद ही एक ऐतिहासिक प्रक्रिया असून त्यात राष्ट्रीयतेचे राजकीय घटकात रूपांतर होऊन लोक स्वतःच्या न्याय्य हक्कांसाठी वेगळे व चैतन्यमय राष्ट्र निर्माण करते.'' मॅकियाव्हेली यांच्या मते,''राष्ट्राच्या निरपेक्ष हिताचा प्रश्न उत्पन्न होतो तेव्हा न्याय किंवा अन्यायाचा विचार करण्याची आवश्यकता नाही. दया व क्रौर्य, प्रशंसा किंवा मानहानी यांचाही विचार करणे अप्रस्तुत ठरते. इतर सर्व गोष्टी बाजूला सारून राष्ट्राने आपले स्वातंत्र्य व अस्तित्व टिकून राहील अशी कृती करावी.''

राष्ट्रवाद ही आधुनिक काळात उदयास आलेली संकल्पना आहे. साधारणपणे १६ व्या शतकात पश्चिम युरोपात उदयास आलेल्या या विचार प्रणालीला १८ व्या १९ व्या शतकात स्थैर्य प्राप्त झाले. आणि आधुनिक काळात ही विचारप्रणाली अतिशय प्रभावी बनली. असे जरी असले तरी, राष्ट्रवादी या विचारप्रणालीचा विकास प्राचीन काळापासून होत आलेला आहे. राज्य अस्तित्वात येण्यापूर्वी मानव टोळीच्या स्वरूपात वास्तव्य करीत होता आणि या समुहामध्ये राष्ट्रवादाची भावना म्हणजेच, आपण सर्व एक आहोत ही भावना अस्तित्वात होती. राष्ट्रवादाचा उगम ग्रीकमध्ये झाल्याचे मानले जाते. कारण ग्रीक नागरिकांमध्ये वंश व धर्मांच्या आधारावर राष्ट्रवादाची भावना अस्तित्वात होती.

महात्मा गांधी हे प्रखर राष्ट्रवादी होते. पण त्याचबरोबर ते आंतरराष्ट्रीयवादाचे पुरस्कर्ते होते. त्यांचा राष्ट्रवाद जहाल आणि आक्रमक स्वरूपाचा नव्हता. त्यामुळे त्यांचा राष्ट्रवाद आंतरराष्ट्रीय शांतता व सलोखा याला पोषख होता. आक्रमणामुळे कोणत्याही राष्ट्राचा फायदा होत नाही. त्यामुळे आपण आपल्या देशाच्या स्वातंत्र्याचा विचार करताना इतर देशांच्या स्वातंत्र्याचाही विचार केला पाहिजे. याविषयी ते म्हणतात की, आपण जर खरे राष्ट्रवादी असलो, तरच आपल्याला खरे आंतरराष्ट्रवादी होता येईल. ते पुढे असेही म्हणतात की, स्वत:च्या देशाबद्दल अभिमान आणि प्रेम असणे ही बाब भूषणवाद आहे. त्यात कुठलाही स्वार्थ किंवा संकुचीतपणा नसतो. स्वार्थ आणि संकुचीतपणा जर त्यात येऊ लागला तर, माझी राष्ट्रवादी विचारसरणी दोषास्पद बनू शकते. गांधीजींना मनोमन असे वाटे की, प्रत्येक राष्ट्राने परकीय जोखडातून मुक्त होऊन आणि स्वत:च्या प्रगतीबरोबर इतर देशाची प्रगती साधावी. जात, वंश, धर्म इत्यादी गोष्टींना त्यात वाव मिळता कामा नये म्हणून असे म्हणता येईल की, गांधीजींच्या विचाराने राष्ट्रवाद आणि आंतरराष्ट्रीयवाद यांचा सुंदर मिलाफ झाला आहे. भारत देश हा सर्व धर्म व पक्षांचा असल्यामुळे व ते या विचारसरणीचे असल्यामुळे ते हिंदू राष्ट्रवादाचे पुरस्कर्ते नव्हते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्रवाद या संदर्भात बौद्धिक पातळी वर विचार मांडताना राष्ट्रवादासंदर्भात त्यांचे मत असे आहे की, केवळ भाषा, धर्म, जात व भौगोलिक एकता हाच राष्ट्राचा आधार नाही. स्वित्झरलँड मध्ये मुख्यता चार भाषा बोलल्या जातात स्वीस हे एक राष्ट्र आहे तसेच एक धर्म असलेल्या पूर्व पाकिस्तान व पश्चिम पाकिस्तान असलेले विभक्त होऊन बांगलादेशाची निर्मिती झाली. एकच जाती, धर्म असलेले अरब राष्ट्रात भावनात्मक एकता दिसून येत नाही. जे की राष्ट्रीय चेतनाचा आधार होतो. तर याउलट भारतात भाषा, धर्म, जात व भौगोलिक विविधता, सांस्कृतिक विविधता असूनसुद्धा भारत एक एकसंघ राष्ट्र निर्माण झाले. याची खरी प्रगती भारतीय राष्ट्रीय स्वातंत्र्य आंदोलनातून दिसून येते. आंबेडकरांच्या मते, राष्ट्रीय चेतनेचा आधार भावनात्मक व अध्यात्मिक एकता आहे. राष्ट्र एक जिवंत आत्मा आहे. एक अमूर्त तत्व आहे. आंबेडकरांच्या दलित आंदोलनाचा मुख्य उद्देश हा होता की, जाती व धार्मिक भेदभाव नष्ट करून समताधिष्टीत समाज निर्माण करणे, हा असून ज्याचा आत्मा व शरीर एक असेल.

संशोधन समस्या (Research of Problem)

१. भारतात स्वातंत्र्य पूर्व कालखंडापासून प्रांतवादाची स्वतंत्र राष्ट्राच्या मागनीची समस्या वाढत चाललेली आहे.

२. भारतात राष्ट्रवाद विरोधी कृत्यात वाढ होत आहे.

३. भारताच्या राजकीय ऐक्यात दिवसेंदिवस घट होत आहे.

४. भारतीय नागरिकांचा राष्ट्रवादावरील विश्वास कमी होत आहे.

५. भारतीय राष्ट्रवादापेक्षा नागरिक स्वार्थाला अधिक प्राधान्य देत आहेत.

६. राजकीय पक्षांचे राजकारण सत्ताप्राप्तीसाठी राष्ट्रवाद विरोधी भूमिका घेत आहे.

७. राष्ट्रबांधनी व राष्ट्रउभारणीत महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राष्ट्रवादी विचारांचा विसर पडत चाललेला आहे.

समकालीन परिस्थितीमध्ये वरीलप्रमाणे देशा समोर गंभीर स्वरूपांच्या समस्या निर्माण झाल्यामुळे महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राष्ट्रवादी विचार देशाला योग्य ती दिशा दाखवू शकतो का? याच दृष्टिकोनातून प्रस्तुत अभ्यासासाठी **महात्मा गांधीजी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राष्ट्रवादी विचारांचे तुलनात्मक अध्ययन** ही संशोधन समस्या निवडली आहे.

अभ्यास विषयाचे स्वरूप (Study of Structure)

प्रस्तुत अभ्यास हा महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राष्ट्रवादी विचारांचा असल्यामुळे यामध्ये चारित्रात्मक भाग केवळ अपरिहार्य स्वरूपात येणार आहे. महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा, त्यांनी निर्माण केलेल्या मूल्यांचा, नैतिकतेचा स्वातंत्र्य लढ्यातील योगदान व राष्ट्रनिर्माणातील योगदानाचा अभ्यास करण्यावर येथे विशेष भर देण्यात येणार आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये (Research of Objectives)

प्रस्तुत अभ्यास पूर्ण करण्यासाठी खालील संशोधनाचे उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१. राष्ट्रवाद ही आधुनिक काळातील अत्यंत महत्त्वाची सर्वमान्य व सर्वव्यापी विचार प्रणाली बनल्यामुळे तीचे सविस्तर अध्ययन करणे.
२. महात्मा गांधी हे भारतातील सर्वमान्य राजकीय नेतृत्व असल्यामुळे त्यांच्या राष्ट्रवादा संबंधिच्या विचारांचे सखोल अध्यापन करणे.
३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे देखील भारतातील सर्वमान्य राजकीय नेतृत्व व भारतीय घटनेचे शिल्पकार असल्यामुळे त्यांच्या राष्ट्रवादा संबंधिच्या विचारांचे अध्ययन करणे.
४. महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राष्ट्रवादी विचारातील साम्य व भेद यांच्या आधारे तुलनात्मक अभ्यास करणे.

संशोधनाची गृहीतके (Research of Hypothesis)

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी निश्चित केलेले गृहीतकृत्ये पुढीलप्रमाणे मांडली आहेत.

१. राष्ट्रवादातून राष्ट्रीय एकात्मता निर्माण होत असली तरी आक्रमक राष्ट्रवादामुळे जागतिक शांततेला धोका निर्माण होतो.
२. महात्मा गांधींच्या राष्ट्रवादाचा विचार राष्ट्रीय विकास, राष्ट्रीय एकात्मतेबरोबरच विश्व शांतीचे समर्थन करणारा आहे.
३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राष्ट्रवादाचा विचार दिन, दलित, शोषित, कामगार, गरीब यांच्या सामाजिक प्रतिष्ठेतून आत्मभान निर्माण करणारा आहे.
४. महात्मा गांधीजी व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राष्ट्रवादी विचार पुरोगामी राष्ट्रवाद असून मानवीमूल्ये जपणारा आहे.

तथ्य संकलन (Data Collection)

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक तथ्य संकलन व दुय्यम तथ्य संकलनाच्या विविध मार्गांचा अवलंब पुढीलप्रमाणे दर्शविला आहे.



प्रस्तुत संशोधन हे वरीलप्रमाणे दर्शविलेल्या द्वितीय स्त्रोतावरच अवलंबून असेल.

संशोधन पध्दती (Research of Method)

सामाजिक शास्त्रामध्ये संशोधनाच्या विविध पद्धती आहेत. प्रस्तुत संशोधन ऐतिहासिक अनुभववादी स्वरुपाचे असून यात वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग करण्यात येईल.

संशोधनाची व्याप्ती (Research of Scope)

संशोधन करीत असताना विषयाला वस्तुनिष्ठ आणि निपक्ष स्वरूप यावे यासाठी संशोधन समस्येची व्याप्ती ठरविणे आवश्यक असते. त्या दृष्टीने प्रस्तुत संशोधनात महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताच्या जडणघडणीतील विशेषता स्वातंत्र्य संग्रामात केलेल्या

कामगिरी बरोबरच भारताच्या उभारणीत सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, नैतिक, अध्यात्मिक कार्याचा आढावा घेऊन त्यांच्या राष्ट्रवादी विचारांचा सखोल अभ्यास केला जाईल.

संशोधनाची मर्यादा (Research of Limitations)

प्रस्तुत अध्ययन क्षेत्र हे ऐतिहासिक स्वरूपाच्या अनेक निर्णयाशी संबंधित आहे. तर राष्ट्रवाद हा तत्कालीन स्वरूपाचा निर्णय असतो. तसेच हा अभ्यास राष्ट्रवादी संकल्पनेशी सुसंगत स्वरूपाचा असल्यामुळे केवळ दोनच विचारवंतांच्या विचारांचा अभ्यास केला जाईल. ही या संशोधनाची मर्यादा आहे.

संशोधनाचे महत्त्व (Research of Importance)

१. राष्ट्रवादाची संकल्पना अधिक समजून घेण्यासाठी.
२. महात्मा गांधी यांनी त्यांच्या राष्ट्रवादी विचारात कोणकोणत्या घटकांना प्राधान्य दिले याच्या अभ्यासासाठी.
३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या राष्ट्रवादी विचारात कोणकोणत्या घटकांना प्राधान्य दिले याच्या अभ्यासासाठी.
४. महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राष्ट्रवादी विचारातील साम्य व भेद जाणून घेण्यासाठी.

पूर्व संशोधन साहित्याचा आराखडा

कोणत्याही विषयावर संशोधन करण्यापूर्वी संशोधन साहित्याचा आढावा घेणे आवश्यक असते. एखाद्या विषयावर पूर्व संशोधन झाले असेल तर त्यातील पून्हः पुन्हा समोर येणाऱ्या बाबी टाळता येतात. तसेच पूर्व संशोधन हे संशोधनाला निश्चित दिशा देण्याचे काम करत असते. प्रस्तुत शोध निबंधाच्या विषयावर अद्यापपर्यंत संशोधन कार्य झालेले नाही. परंतु महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब या विचारवंताच्या इतर विचारावर संशोधन कार्य झालेले आहे.

१. Dr. Mishra Anuradha यांनी A Comparative Study of Ideas of Mahatma Gandhi and Dr. Bhimrao Ambedkar With Reference to Social Justice या विषयावर KUMAUN University -२००९ या विद्यापीठात संशोधन कार्य झालेले आहे.

२. Singh Renu यांनी Dr. Bheemrao Ambedkar Samajik Nyay Samajvad Aur Rashtravad Sambandhit Vicharo Ka Vishleshnatmak Adhyayan या विषयावर Dr. Rammanohar Loia Avadh University, Faizabad-२००९ या विद्यापीठात संशोधन कार्य झालेले आहे.

वरील दोन्ही अभ्यासकांचे महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक न्याय व राष्ट्रवादी विचार या संकल्पनाचे विश्लेषनात्मक अध्ययन झालेले आहे. म्हणूनच प्रस्तुत शोधप्रबंधात महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राष्ट्रवादी विचारांचे तुलनात्मक अध्ययन झालेले नाही. म्हणून महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राष्ट्रवादी कार्याचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी हा विषय निवडला आहे.

संशोधन आराखडा (Research of Design)

प्रस्तुत शोधप्रबंध एकूण सहा प्रकरणात विभागला असून प्रबंध स्वरूपाच्या आकलणासाठी त्यातील आशयाचे प्रकरण निहाय विवेचन थोडक्यात पुढीलप्रमाणे-

प्रकरण पहिले : प्रस्ताविक

प्रस्तुत संशोधनात संशोधन समस्या, संशोधनाचे उद्दिष्ट्ये, संशोधनाचे गृहीतके, संशोधनाची व्याप्ती, संशोधनाची मर्यादा, संशोधन पध्दती, तथ्य संकलन, संशोधनाचे महत्त्व, संशोधन आराखडा इत्यादींचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण दुसरे : राष्ट्रवाद म्हणजे काय ?

प्रस्तुत प्रकरणामध्ये राष्ट्रवादाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, अर्थ, व्याख्या, आधारभूत घटक, प्रकार, राष्ट्रवादाचे गुण व दोष इत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण तिसरे : महात्मा गांधी व राष्ट्रवाद

प्रस्तुत प्रकरणामध्ये महात्मा गांधी यांचा थोडक्यात परिचय त्यांचे राष्ट्रवादासंबंधिचे विचार इत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण चौथे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर व राष्ट्रवाद

प्रस्तुत प्रकरणामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा थोडक्यात परिचय त्यांचे राष्ट्रवादासंबंधिचे विचार इत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण पाचवे : महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राष्ट्रवादी विचारांचे तुलनात्मक अध्ययन

प्रस्तुत प्रकरणामध्ये महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राष्ट्रवादी विचारांचे साम्य व भेद असे तुलनात्मक अध्ययन करण्यात येईल.

प्रकरण सहावे : सारांश व निष्कर्ष

प्रस्तुत प्रकरणात संशोधनाअंती हाती आलेल्या निष्कर्षाची मांडणी करण्यात येईल.

संदर्भग्रंथ

१. त्रिपाठी सत्येंद्र द्विवेदी कृष्णदत्त, *भारतीय राष्ट्रवाद स्वरूप आणि विकास*

२. एन्थोनी स्मिथ, *नेशनलिस्ट मुवमेन्ट्स*

३. देसाई ए. आर., *भारतीय राष्ट्रवादाची सामाजिक पृष्टभूमी व दी मेकेमिलन कंम्पनी ऑफ इंडिया लि*. नई दिल्ली, ११७७

४. गांधी एम. के. *आत्मकथा* (सत्य के प्रयोग), डॉ. नवजिवन प्रकाशन, अहमदाबाद १९५७

५. दादा धर्माधिकारी : *गांधीजींची दृष्टी*, पुढचे पाउल सर्व सेवा संघ प्रकाशन, वाराणसी, १९९२

६. ब्रिजमोहन हेडा (अनुवादक), *महात्मा गांधीचे विचार*, नवजिवन प्रकाशन, मंदीर अहमदाबाद

७. बी. आर. आंबेडकर, *पाकिस्तान आणि द पर्टिशन ऑफ इंडिया*

८. बी. आर. आंबेडकर, *पाकिस्तान एण्ड द पार्टीशन ऑफ इंडिया*

९. पुश्ववराज गेन एवं बी. एल. फडिया, *भारतीय शासन एवं राजनीति*, प्रतियोगिता साहित्य सिरीज, आगरा

१०. Purohit B. R. *Hindu Revivalism and India Nationalism*; Sahi Prakashan, Sagar

११. Johari J. C., *Indian Government and Politics*, Vishal Prakashan, New Delhi, 1976

१२. व्ही.बी.पाटील, *संशोधन पद्धती*, प्रशांत पब्लिकेशन जळगाव, प्रथमावृत्ती २०१२

१३. ए.एन.भक्कड, *संशोधन पद्धती*, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, २०१२

१४. Kothan C.R., *Research Methodology, Methods and Techaigues*, New Delhi, Age International Publisher. 2006

१५. गुरुनाथ नाडगोडे, *सामाजिक संशोधन पध्दती*, फडके प्रकाशन, कोल्हापूर २००१

१६. प्रा.एस.डी.दराडे, *संशोधन पद्धती*, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, प्रथमावृत्ती २०१३

१७. प्रदिप आगलावे, *सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे*, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर

संशोधक

लक्ष्मण बाबाराव यादव
M.A., Be.D., NET
राज्यशास्त्र विभागप्रमुख
बाबासाहेब देशमुख पारवेकर
महाविद्यालय, पारवा
ता. घाटंजी जि. यवतमाळ

मार्गदर्शक

प्रा.डॉ. डी.एच. मेहत्रे
(M.A., SET, NET, M.Phil., Ph.D.)
राज्यशास्त्र विभागप्रमुख
राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड
ता. मुदखेड जि. नांदेड